उप संचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांच्या अधिपत्याखालील सामान्य रुग्णालय, पालघर येथील एकूण १२ अस्थायी पदांना मुदवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अपदे २०१८/प्र.क्र.१०२ /आरोग्य-३ अ
१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी.रुग्णालय आवार, मुंबई ४०० ००१
दिनांक: ३० मार्च, २०१९

वाचा -

१. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक : अपदे-२०१८/प्र.क्र.१०२/आ-३ अ,दि.३१.१०.२०१८
२. सहसंचालक, आरोग्य सेवा,(रुग्णालये) राज्यस्तर मुंबई, मंडळ यांचे पत्र क्र.संआसे/कक्ष-३/टे-१२/मुंबईमंडळ,ठाणे/अपदेमुदवाढ/सन१९-२०/३००५-०६/१९ दि.१५.०२.२०१९
३. शासन निर्णय क्रमांक : पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.२१.०२.२०१९.

शासन निर्णय-

संदर्भाधिन क्र.१ येथील शासननिर्णय क्र.अपदे २०१८/प्र.क्र.१०२/ आरोग्य-३अ, दि.३१.१०.२०१८ अन्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांच्या अधिपत्याखालील सामान्य रुग्णालय, पालघर येथील एकूण १२ अस्थायी पदे चालू ठेवण्यास दि.१/१०/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

२. संदर्भाधीन क्र.२ येथील प्रस्तावास अनुसरुन सदर पदांना दि.१/०३/२०१९ ते दि.३०/०९/२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर १२ अस्थायी पदाना शासन निर्णय वित्त विभाग क्र पदनि-२०१६/ प्र.क्र.८/१६/आ.पु.क दि.२१/०२/२०१९ मधील अटीच्या अधीन राहून दिनांक १/०३/२०१९ ते दिनांक ३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खाली दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात यावा आणि हा खर्च सन २०१९-२०२० या वर्षाकरिता मंजूर झालेल्या अनुदानातून भागवण्यात यावा.

मागणी क्रमांक आर-१
२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०१-नागरी आरोग्य सेवा व विषम चिकित्सा,

११०-रुग्णालये व दवाखाने

११०-७ पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्ग योजना

(०६)(०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालय व दवाखाने (२२१००२२६)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८१८२०३७५५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed4c738df60ac2ac776b9e2481f77ad50aba9dc28bb31a482e03c7ee7b6f64d8, serialNumber=7caa550613a8c4cb7c593368faa24e20d6f8985f510118e6fc1af8b04a443ee8, cn=Rajendra Shamraoji Kaurte
Date: 2019.03.30 17:53:08 +05'30'

(रा.शा.कौरते)
(अवर सचिव, महाराष्ट्र शासन)

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व लेखापरिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
२) आयुक्त, आरोग्य सेवा, आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई.
३) संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय, मुंबई.
४) सहसंचालक, आरोग्य, रुग्णालय (राज्यस्तर), मुंबई.
५) उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ,ठाणे
६) जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर
७) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, पालघर,
८) महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
९) वित्त विभाग (व्यय १३)/वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय, मुंबई.
१०) अवर सचिव/कक्ष अधिकारी (सेवा-२, सेवा-३, सेवा-५, अर्थसंकल्प), सार्वजनिक अरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवडनस्ती (आरोग्य-३ अ)